Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**
Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/ 2636
दिनांक:- 8/2/2022

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा-सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक (इ.१२वी) मार्च/एप्रिल २०२२ परीक्षा प्रवेशपत्रांबाबत ( Hall Ticket)**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक (इ.१२ वी) मार्च/एप्रिल २०२२ च्या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन पध्दतीने बुधवार दि.०९/०२/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजल्यापासून उपलब्ध होणार असून, त्यासंदर्भात कनिष्ठ महाविद्यालयानी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

१. मार्च/एप्रिल २०२२ इयत्ता १२ वी परीक्षेसाठी ऑनलाईन सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket) बुधवार दि.०९/०२/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजल्यापासून मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. प्रवेशपत्रे College login मध्ये download करावयाची आहेत.
२. मार्च/एप्रिल २०२२ इ.१२वी परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन प्रिंट काढून त्यावर प्राचार्यांनी शिक्का मारुन सही करावयाची आहे. त्यानंतर प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.
३. प्रवेशपत्राची (Hall Ticket) ऑनलाईन प्रिंटींग करताना प्रिंट साठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये.
४. प्रवेशपत्रामध्ये(HallTicket) विषय व विषयाचे माध्यम इ. मध्ये दुरुस्त्या असतील तर कनिष्ठ महाविद्यालयांनी तातडीने या कार्यालयात येवून सोबतच्या विहित तक्त्यात दुरुस्ती करुन घ्यावयाची आहे. जेणेकरून परीक्षा केंद्रावर वेळेत प्रश्नपत्रिका पुरविणे शक्य होईल.
५. प्रवेशपत्रामध्ये (HallTicket) विद्यार्थ्यांच्या नावात, जन्मतारखेत तसेच विद्यार्थ्याचा फोटो, स्वाक्षरी इ. दुरुस्त्या असतील तर अशा दुरुस्त्या कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर करुन एक प्रत तातडीने या कार्यालयास सादर करावयाची आहे.
६. विद्यार्थ्यांकडून प्रवेशपत्र (Hall Ticket) गहाळ झाल्यावर कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर पुनश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.
७. प्रवेशपत्रावर (Hall Ticket) विद्यार्थ्यांचा चूकीचा फोटो असल्यास त्याजागी संबंधित विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून फोटोवर प्राचार्यांनी शिक्का मारुन सही करावी.
**८. ज्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक OMR गुणपत्रिकेत किंवा ग्रेडलिस्ट मध्ये समाविष्ट झालेले नाहीत त्यांचे प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षा गुण/ ग्रेडलिस्टची नोंद EXTRA ENTRY म्हणून शाळेच्या/ कनिष्ठ महाविद्यालयाच्या लेटरहेडवर विषयनिहाय स्वतंत्र प्राचार्याच्या सही शिक्क्यासह ज्या त्या पाकीटात स्वतंत्र पाकिटातून प्रात्यक्षिक साहित्य जमा करताना वितरण केंद्रावर देण्यात यावे.**

तरी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन प्रवेशपत्र (HALL TICKET) ,प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षा / ग्रेड लिस्ट EXTRA ENTRY इत्यादी बाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. काही तांत्रिक अडचण उदभवल्यास तातडीने या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**(एस.डी.सोनवणे)**
**विभागीय सचिव,** प्रभारी
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

सोबत :- प्रवेशपत्रातील/ कनिष्ठ महाविद्यालय यादीतील चुकांच्या दुरुस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र (विहित नमुन्यातील तक्ता)

प्रत:- मा.सचिव राज्य मंडळ ,पुणे.

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव:-
1) मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर.
2) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा/सांगली/कोल्हापूर.

# प्रवेशपत्रिकेतील / कनिष्ठ महाविद्यालय यादीतील चुकांच्या दुरूस्तीसाठी कळविण्याचे प्रपत्र

To be Submitted Before Examination

प्रपत्र परीक्षेपूर्वी दोन दिवसांपर्यंत समक्ष सादर करणे आवश्यक आहे.

क. महाविद्यालयाचा क्रमांक :- | J | | | | | | | |

**HSC Examination of Feb.-March /Sept.-Oct. ________**

Proforma Indicating Errors in the Seat No. Wise College List of Candidates

| Sr.No.<br>अ.क्र. | Application No.<br>आवेदनपत्र क्र. | Seat No.<br>बैठक क्रमांक | Name of Candidate<br>विद्यार्थ्यांचे नाव | Orignal/Incorrect Position in the College List/Hall Ticket<br>कनिष्ठ महाविद्यालय यादीतील/ प्रवेशत्रिकावरील नोंद | Correct Position as per the College Record<br>क.महाविद्यालयाच्या अभिलेखाप्रमाणे आवश्यक दुरूस्ती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(प्रपत्र इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे.)

प्राचार्य

स्थळ - ____________

दिनांक- ____________